# शिव पावन परिक्रमा पर्यटनासाठी नसून प्रेरणेसाठी

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पन्हाळा-पावनखिंड शिव पावन प्रेरणा परिक्रमेत सहभागींसमवेत संवाद साधताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील, डॉ. पी.टी. गायकवाड, डॉ. डी.के. गायकवाड आदी.**


**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिव पावन परिक्रमा ही पर्यटनासाठी नसून प्रेरणेसाठी आहे. सहभागींनी या परिक्रमेतून आयुष्यभरासाठीचा प्रेरणेचा स्त्रोत स्वतःसोबत घेऊन जावे, हाच यामागील उद्देश आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय पन्हाळा ते पावनखिंड शिव पावन प्रेरणा परिक्रमेच्या प्रारंभप्रसंगी पन्हाळा येथे ते बोलत होते.

शनिवारी सकाळी ७.३० वाजता पन्हाळा येथील बाजीप्रभू देशपांडे व वीर शिवा काशीद यांच्या पुतळ्यांचे दर्शन घेऊन ही मोहीम सुरू झाली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, तत्कालीन परिस्थितीमध्ये कोणत्याही दळणवळणाच्या साधनांअभावी, विजेच्या सुविधेअभावी निव्वळ छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्यावरील निष्ठेपोटी बाजीप्रभू देशपांडे आणि वीर शिवा काशीद यांनी आपली प्राणाहुती दिली. त्यांची निष्ठा आणि त्यांचे कार्य इतिहासात अमर झाले. महाराजांनीही पुढे स्वराज्याचे तोरण बांधले. आदिलशाही नजरकैदेतून, कडेकोट पहाऱ्यांमधून मोठ्या दिलेरपणाने आपली सुटका करवून घेत महाराजांनी पन्हाळ्यावरून विशाळगडाकडे कूच केले. जनतेचा हा पोशिंदा सुखरूप विशाळगडावर पोहोचावा, म्हणून या दोन नरवीरांनी आपल्या जिवाची बाजी लावली आणि स्वराज्यासाठी प्राण त्यागले. हा सारा इतिहास या दोन दिवसांच्या परिक्रमेमध्ये प्रत्येक सहभागीच्या मनामनांत जागला पाहिजे. ही परिक्रमा म्हणजे पर्यटन नव्हे, तर याच प्रेरणेचा झरा आणि ऊर्जेचा स्त्रोत आपल्यामध्ये जागृत करण्याची संधी म्हणून विद्यार्थ्यांनी, स्वयंसेवकांनी आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांनी पाहिले पाहिजे. त्यासाठीच या मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे.

या परिक्रमेत राष्ट्रीय सेवा योजन समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील, प्रा. पोपट माळी यांच्यासह विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी आणि कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांमधून राष्ट्रीय सेवा योजनेचे सुमारे दीडशे स्वयंसेवक सहभागी झाले आहेत. या परिक्रमेअंतर्गत ऐतिहासिक माहिती घेण्याबरोबरच परिक्रमा मार्गावर स्वच्छता मोहीम तसेच शाहिरी पोवाडा आदी प्रबोधन कार्यक्रमही घेण्यात येणार आहेत.



कोल्हापूर : शोधनिबंध संग्रहाचे प्रकाशन करताना डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. क्रांतिकुमार पाटील, प्राजक्त पाटील, डॉ. तेजस्विनी मुडेकर आदी.

# अभ्यासेतर उपक्रमांना महत्त्व हवे : डॉ. शिर्के

टेंबलाईवाडी, ता. २२ : 'अभ्यासक्रमाबरोबर अभ्यासेतर उपक्रमांना महत्त्व देणे आवश्यक आहे. 'नॅक'मुळे अभ्यासक्षेत्र उपक्रमांना चालना मिळाली. समाजाच्या गरजेनुसार अभ्यासक्रमांची रचना होणे आवश्यक आहे,' असे मत शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले. कमला महाविद्यालयात 'अभ्यासांतर्गत, अभ्यासेत्तर व विस्तार कार्यक्रमांचे उच्चशिक्षणातील महत्त्व' या विषयावरील झालेल्या चर्चासत्रात ते बोलत होते.

प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील अध्यक्षस्थानी होते. यावेळी शोधनिंबध ग्रंथाचे प्रकाशन झाले. दुसऱ्या सत्रात एन. एस. एसचे अधिकारी डॉ. हरिभाऊ वनमोरे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे व्यक्तिमत्व विकासातील महत्व पटवून दिले.

तिसऱ्या सत्रात विविध महाविद्यालयातील प्राध्यापकांनी पेपर सादरीकरण केले. चर्चासत्राच्या कन्व्हेनर मेजर वर्षा साठे व प्रा. अनिल घस्ते यांनी प्रास्ताविक केले. प्राजक्त पाटील, प्रा. डॉ. अस्मिता पाटील, प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर उपस्थित होते. प्रा. डॉ. नीता धुमाळ, प्रा. रेखा पंडित, प्रा. डॉ. वर्षा मैंदर्गी, प्रा. डॉ. सुजय पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

# अभ्यासक्रम समाजाभिमुख हवा

कोल्हापूर : 'अभ्यासक्रमावरोबर अभ्यासेतर अक्रमांना महत्त्व देणे आवश्यक आहे. 'नॅक'मुळे अभ्यासेतर उपक्रमांना चालना मिळाली आहे. हे लक्षात घेऊन समाजाच्या गरजेनुसार अभ्यासक्रमाची रचना होणे आवश्यक आहे', असे मत शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले.

कमला कॉलेजमध्ये 'अभ्यासांतर्गत, अभ्यासेतर आणि विस्तार कार्यक्रमाचे उच्च शिक्षणातील महत्त्व' या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील होते.

यावेळी शोधनिबंध ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. दुसऱ्या सत्रामध्ये एनएसएसचे अधिकारी डॉ. हरीभाऊ वनमोरे यांनी एनएसएसच्या उपक्रमांचे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासातील महत्त्व पटवून दिले. तर ब्रिगेडीयर संजीव सरनाईक यांनी एनसीसीच्या उपक्रमांतून देशाला चांगल्या व्यक्तिमत्त्वाचे नागरिक घडविण्याची संधी मिळत असते. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाच्या वतीने नेतृत्व घडविण्यासाठी एनसीसीचे उपक्रम कसे उपयुक्त ठरतात हे सोदाहरण पटवून दिले.



कमला कॉलेमध्ये आयोजित चर्चासत्रात बोलताना प्र कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. व्यासपीठावर डॉ. क्रांतिकुमार पाटील, प्राजक्त पाटील, तेजस्विनी मुडेकर, वर्षा साठे व अनिल घस्ते.

## प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांचे मत

तिसऱ्या सत्रामध्ये सहभागी विविध महाविद्यालयांतील प्राध्यापकांनी पेपर सादरीकरण केली. चर्चासत्राच्या कन्व्हेनर मेजर वर्षा साठे व चर्चासत्राचे को ऑर्डिनेटर प्रा. अनिल घस्ते यांनी प्रास्ताविक केले. संस्थेच्या सचिव प्राजक्त पाटील, प्रा. डॉ. अस्मिता पाटील, कमला कॉलेजच्या प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर उपस्थित होत्या.

या एकदिवसीय चर्चासत्रात विविध सत्रांचे स्वागत व सूत्रसंचालन नीता धुमाळ, रेखा पंडित, वर्षा मेंदर्गी, सुजय पाटील यांनी केले. अनघा पाठक यांनी आभार मानले. चर्चासत्राच्या यशस्वितेसाठी नेताजी पोवार, सुमती साळुंखे, एनसीसी व एनएसएसच्या विद्यार्थिनींनी विशेष सहकार्य केले.



**कोल्हापूर : कमला कॉलेजमध्ये आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात शोधनिबंध ग्रंथाचे प्रकाशनप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. क्रांतिकुमार पाटील, डॉ. तेजस्विनी मुडेकर आदी.**

# राष्ट्र उभारणीत अभ्यासेतर उपक्रमांची कामगिरी महत्त्वपूर्ण

## प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; 'कमला'मध्ये राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राष्ट्र उभारणीत अभ्यासेतर उपक्रमांची कामगिरी महत्त्वपूर्ण ठरते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

कमला कॉलेजमध्ये 'अभ्यासांतर्गत, अभ्यासेतर आणि विस्तार कार्यक्रमांचे उच्च शिक्षणातील महत्त्व' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील होते.

डॉ. शिर्के म्हणाले, अभ्यासक्रमाबरोबरच अभ्यासेतर उपक्रमांनादेखील महत्त्व देणे आवश्यक आहे. नॅकमुळे अभ्यासेतर उपक्रमांना चालना मिळाली आहे.

याप्रसंगी शोधनिबंध ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. डॉ. हरिभाऊ वनमोरे, ब्रिगेडियर संजीव सरनाईक यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्रा. अनिल घस्ते यांनी केले.

यावेळी संस्थेचे सचिव प्राजक्ता पाटील, प्रा. डॉ. अस्मिता पाटील, प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर उपस्थित होत्या. सूत्रसंचालन प्रा. डॉ. नीता धुमाळ यांनी केले. प्रा. डॉ. अनघा पाठक यांनी आभार मानले.

# अभ्यासेतर उपक्रमांना महत्त्व देणे गरजेचे

## - डॉ. डी. टी. शिर्के

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

अभ्यासक्रमाबरोबर अभ्यासेतर उपक्रमांना महत्त्व देणे आवश्यक आहे. नॅकमुळे अभ्यासेतर उपक्रमांना चालना मिळाली असून, समाजाच्या गरजेनुसार अभ्यासक्रमांची रचना होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. ते कमला कॉलेजमध्ये 'अभ्यासांतर्गत, अभ्यासेतर आणि विस्तार कार्यक्रमांचे उच्च शिक्षणातील महत्त्व' या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात बोलत होते. अध्यक्षस्थानी ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील होते.

डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, विद्यार्थी वर्गामध्ये जेवढे ज्ञान मिळवतो, त्यापेक्षा विविध उपक्रम व कृतीद्वारे त्याला मिळणारे ज्ञान व अनुभव खूप महत्त्वाचे असतात. विद्यापीठामार्फत आयोजित केले जाणारे इंद्रधनुष्य, आविष्कार, एनएसएसचे शिबिर, विविध क्रीडा महोत्सव यांच्या सहभागातून विद्यार्थ्यांचा शैक्षणिक, मानसिक, शारीरिक विकास होत असतो. त्यामुळे शिक्षक व पालकांनी अशा शिबिरांमध्ये भाग घेण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. सोशल मीडियाच्या माध्यमावर अवलंबून न राहता विद्यार्थ्यांनी स्वतः माहितीचे स्रोत तपासून बघावेत. ग्रंथालये व प्रयोगशाळांमधून खऱ्या सत्याचा शोध घ्यावा.



कोल्हापूर : कमला महाविद्यालयात झालेल्या एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात बोलताना शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.

मान्यवरांच्या हस्ते शोधनिबंध ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. दुसऱ्या सत्रामध्ये एनएसएसचे अधिकारी डॉ. हरिभाऊ वनमोरे यांनी एनएसएसच्या उपक्रमांचे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासातील महत्त्व पटवून दिले. ब्रिगेडियर संजीव सरनाईक यांनी एनसीसीच्या उपक्रमांतून देशाला चांगल्या व्यक्तिमत्त्वाचे नागरिक घडवण्याची संधी मिळत असते. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाच्या वतीने नेतृत्व घडवण्यासाठी एनसीसीचे उपक्रम कसे उपयुक्त ठरतात हे विविध उदाहरणांद्वारे त्यांनी पटवून दिले.

तिसऱ्या सत्रामध्ये सहभागी विविध महाविद्यालयांतील प्राध्यापकांनी पेपर सादरीकरण केले. मेजर वर्षा साठे व प्रा. अनिल घस्ते यांनी प्रास्ताविक केले. संस्थेचे सचिव प्राजक्त पाटील, डॉ. अस्मिता पाटील, कमला कॉलेजच्या प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर हे उपस्थित होते. विविध सत्रांचे सूत्रसंचलन प्रा. डॉ. नीता धुमाळ, प्रा. रेखा पंडित, डॉ. वर्षा मैंदर्गी, डॉ. सुजय पाटील यांनी केले. डॉ. अनघा पाठक यांनी आभार मानले. चर्चासत्राच्या यशस्वितेसाठी डॉ. नेताजी पोवार, प्रा. सुमती साळुंखे, एनसीसी व एनएसएसच्या विद्यार्थिनींनी विशेष सहकार्य केले.

# नॅक मूल्यांकनासाठी जोरदार तयारी

## शिवाजी विद्यापीठाचा डेटा बेस मूल्यांकनावर नॅकचा भर, विद्यार्थ्यांचा प्रतिसादही महत्त्वाचा ठरणार

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २२ : शिवाजी विद्यापीठाचे नॅशनल असेसमेंट ॲण्ड एक्रेडिएशन कौन्सिल (नॅक) मूल्यांकन लवकरच होणार आहे. यंदा मूल्यांकन पद्धतीत बदल करण्यात आले आहेत. यावर्षीचे मूल्यांकन हे माहितीच्या आधारे (डेडा बेस) होणार आहे. यासाठी बनवण्यात आलेल्या पोर्टलवर माहिती भरण्याचे काम पूर्ण झाले असून, आता पुढची प्रक्रियाही लवकरच पूर्ण होईल. यावर्षी नॅक मूल्यांकनात शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन याबरोबरच पर्यावरणपूरक परिसर, विद्यार्थ्यांचा प्रतिसाद (फिडबॅक) या बाबीही महत्त्वाच्या ठरणार आहेत.**

नॅक मूल्यांकन देशातील सर्वच विद्यापीठांना बंधनकारक असून यामाध्यमातून विद्यापीठाचा दर्जा ठरतो. शिवाजी विद्यापीठाला गेल्या मुल्यांकनामध्ये अ दर्जा प्राप्त झाला होता. मात्र यंदा नॅकने मुल्यांकन पद्धती बदलली आहे. या मध्ये अधिक पारदर्शकता आणण्यासाठी ती माहितीच्या पातळीवर (डेटा बेस) राबवण्यात येणार आहे. यासाठी एक पोर्टल बनवण्यात असून त्यामध्ये दिलेल्या निर्देशानुसार विद्यापीठाने माहिती भरायची आहे. यासाठी १ हजार गुणांचे मुल्यांकन होणार आहे. यामध्ये विद्यापीठाचे प्रशासन, शैक्षणिक पद्धती त्यामध्ये होणारा तंत्रज्ञानाचा वापर,



अभ्यासक्रम, विद्यापीठातील पायाभूत सुविधा, विद्यापीठाने राबवलेले विविध समाजोपयोगी आणि शैक्षणि उपक्रम, संशोधन, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर विद्यापीठातील विद्यार्थी, प्राध्यापक यांचे प्रसिद्ध झालेले संशोधन निबंध या सर्व गोष्टींचे मुल्यांकन बदललेल्या मुल्यांकन पद्धतीमध्ये होणार आहे.

विद्यापीठाने पाच महिव्यांपूर्वीच नॅक मुल्यांकनासाठी एक समिती गठीत केली. नॅकने सांगितलेले सर्व निकषांप्रमाणे माहिती संकलीत करणे आणि त्या निर्देशाप्रमाणे अपलोड करणे याबाबत मार्गदर्शन करणे हे या समितीचे काम आहे. पहिल्या टप्प्यामध्ये विद्यापीठाने या सर्व माहिती संकलन केले. यामध्ये विद्यापीठातील संशोधनाची माहिती संकलीत करण्यावर भर देण्यात आला. दुसऱ्या टप्प्यामध्ये माहितीचे पृथकरण करण्यात आले. कारण नॅक मुल्यांकनामध्ये या माहितीला सर्वाधिक महत्त्व आहे. विद्यापीठाने पोर्टलवर भरलेली माहिती आणि प्रत्यक्ष वस्तुस्थिती यामध्ये केवळ २० टक्के तफावत ग्राह्य धरली जाईल. तफावतीचे प्रमाण यापेक्षा अधिक असल्यास त्याचा थेट परिणाम मुल्यांकनावर होतो. पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी विद्यापीठात मुलांसाठी नवीन वसतिगृह बांधण्यात येत आहे. या शिवाय विविध अधिविभागांच्या डागडुजीचे आणि विस्ताराचे कामही सुरू आहे. लवकरच विद्यापीठाचे मुल्यांकन प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

### विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांचे मत महत्त्वाचे

मूल्यांकनात विद्यार्थी आणि कर्मचारी यांचे एक सर्वेक्षण केले जाणार आहे. यात विद्यार्थ्यांचे विद्यापीठाविषयीचे मत, विविध बाबतीत त्यांची भूमिका या गोष्टी महत्त्वाच्या ठरणार आहेत. यासाठी सराव म्हणून दोन वेळा विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करण्यात आले. अंतिम सर्वेक्षणही लवकरच होणार आहे. माजी विद्यार्थ्यांचेही सर्वेक्षण केले जाईल.

**नॅकच्या बदललेल्या मूल्यांकन पद्धतीच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाची तयारी चांगल्या पद्धतीने सुरू आहे. निश्चित केलेल्या कालावधीच्या आधीच ही तयारी पूर्ण होईल. विद्यापीठातील विद्यार्थी, अध्यापक यांनी केलेले संशोधनही मूल्यांकनात महत्त्वाचे ठरणार आहे. निश्चितच नॅक मूल्यांकनात विद्यापीठ सर्वोत्तम कामगिरी करेल.**

**- डॉ. डी. टी. शिर्के,** प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

### असे होईल मूल्यांकन

**(आकडे गुणांचे आहेत)**

| | |
|---|---|
| संशोधन | २५० |
| अध्यापन पद्धती | २०० |
| प्रशासन | १०० |
| अभ्यासक्रम | १५० |
| पायाभूत सुविधा | १०० |
| विद्यार्थी प्रतिसाग | १०० |
| शैक्षणिक, सामाजिक उपक्रम | १०० |

# विद्यापीठात नवा गॅस प्रकल्प

## कचऱ्यापासून होणार गॅसनिर्मिती; स्वयंपाकासाठी उपयोग

सकाळ वृत्तसेवा

**उजळाईवाडी, ता. २२ : शिवाजी विद्यापीठातील बी. टेक वसतिगृहात कचऱ्यापासून गॅसनिर्मितीचा प्रकल्प सुरू आहे. येथे कचऱ्यापासून गॅस बनवला जात असून तो स्वयंपाकासाठी वापरला जातो. असा एक नवा प्रकल्प आता मुलांच्या वसतिगृहाजवळ उभारला जाणार आहे.**

महिन्याला २५ सिलिंडर एवढी गॅसनिर्मिती या ठिकाणी होईल. यामुळे आता स्वयंपाकासाठी विद्यापीठाला बाहेरून गॅस कमी प्रमाणात आणावा लागेल. पाण्यापाठोपाठ विद्यापीठ आता गॅसच्या बाबतीतही स्वयंपूर्ण होईल.

शिवाजी विद्यापीठात सुमारे १००० विद्यार्थी आणि विद्यार्थिनी वसतिगृहात राहतात. त्यांच्यासाठी जेवणही येथे बनवले जाते. त्यासाठी सध्या सिलिंडर बाहेरून आणले जातात. मात्र, गेल्या वर्षी बी-टेक वसतिगृहात अतिरिक्त अन्न आणि कचरा यांच्यापासून गॅस



बनवण्याचा प्रकल्प सुरू झाला. या ठिकाणी शंभर किलो कचऱ्यापासून रोज आठ किलो गॅस बनवला जातो. हा गॅस स्वयंपाकासाठी वापरला जातो.

> **विद्यार्थ्यांचे अन्न बनवण्यासाठी गॅस ही मूलभूत गोष्ट आहे. बायोगॅस प्रकल्पामुळे कचरा व्यवस्थापन तर होईलच, पण पाणी, सौर ऊर्जा याचबरोबर गॅसच्या बाबतीतही विद्यापीठ स्वयंपूर्ण होईल. हा प्रकल्प पथदर्शी असून अन्य शैक्षणिक संस्थांनाही तो उपयुक्त आहे.**
>
> - **डॉ. डी. टी. शिर्के**, प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ.

बी-टेक वसतिगृहातील विद्यार्थ्यांचा स्वयंपाक या गॅसवर बनवला जातो. या प्रकल्पाच्या यशस्वीतेनंतर आता विद्यापीठाने अधिक क्षमतेचा गॅस प्रकल्प उभारण्याचे निश्चित केले आहे. हा प्रकल्प मुलांच्या वसतिगृहाजवळ होणार असून, याची क्षमता अधिक आहे. रोज एक सिलिंडर गॅसची निर्मिती करण्याचे विद्यापीठाचे उद्दिष्ट आहे. यासाठी रोज सुमारे ४०० किलो कचरा लागणार आहे.

यामध्ये मेस आणि कॅन्टीमधील अतिरिक्त अन्न व अन्य कचऱ्यापासून हा गॅस बनवला जाणार आहे. लवकरच हा प्रकल्प कार्यान्वित होईल. यामुळे पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण असणारे विद्यापीठ गॅसच्या बाबतीतही स्वयंपूर्ण होईल.